## तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. १५/२०१९**
**निशाणी क्र. ३५**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. घाटंजी सरकारी अभियोक्ता

**..वि..**

**भारत माणिक दलाल** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. १** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | सौ. नंदा पुंडलिक कांगणे |
| वय अंदाजे ५१ वर्षे | धंदा- नोकरी, ग्रामसेवक |
| राहणार | प्रोफेसर कॉलनी, घाटंजी, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

माझे माहेरचे आडनाव कांगणे असून माझे सासरेच आडनाव मुंडे आहे. सन २०१६ मध्ये मी पंचायत समीती घाटंजी येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होती. माझ्या अधिनस्त टिटवी, मारेगाव व इतर गावे आहेत. मी आरोपीला ओळखते व तो टिटवी या गावामध्ये राहतो व तो आज न्यायालयामध्ये हजर आहे.

२. दिनांक १६/०७/२०१६ रोजी पंचायत समिती घाटंजीच्या हॉलमध्ये मिटींग होती. त्या मिटींगमध्ये गट विकास अधिकारी श्री मानकर, विस्तार अधिकारी श्री मस्के तसेच ग्रामसेवक भांडवलकर साहेब, गाउत्रे साहेब, इंगोले साहेब, हांडे साहेब व इतर लोक हजर होते. मिटींग सकाळी ११.०० वाजता सुरु झाली व संध्याकाळी ४.४५ वाजता संपली. मिटींग संपल्यावर विस्तार अधिकारी मस्के यांच्यासोबत चर्चा सुरु असतांना आरोपी व त्यांचे सहकारी तेथे आले. आरोपीने मला तेव्हा म्हटले की ‘‘विहीरीच्या मस्टरवर सह्या करा’’. विहिरीचे काम अस्तीत्वात नसल्यामुळे, मी मस्टरवर सह्या करण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपीने मला जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने माझ्या हातामध्ये असलेले रेकॉर्ड हिसकावून फेकून दिले व माझा हात आरोपीने ओढला, माझ्या बांगड्या सुध्दा ओढल्या तसेच आरोपीने माझा

पदर सुध्दा ओढला. आरोपीने मला शिवीगाळ केली की "तु लई शाहाणी झालीस का तुला बघून घेतो, तु ये गावामध्ये". आरोपीने माझा हात ओढल्यामुळे माझ्या हाताला जखमा झाल्या. असे कृत्य करुन आरोपीने माझ्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. त्यामुळे मी आरोपीच्या विरोधात कैफियत देण्याकरीता पोलीस स्टेशनला गेली. पोलीसांनी मला ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे वैद्यकीय तपासणी करीता पाठवीले. डॉक्टरांनी माझी वैद्यकीय तपासणी केली व त्यानंतर मी पोलीस स्टेशनला परत आले. त्यानंतर मी आरोपीच्या विरोधात लेखी कैफियत दिली. कैफियतीवर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ती कैफियत **निशाणी क्रमांक ३६** वर आहे. प्रथम वर्दी अहवाल मला दाखविला, त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे व तो **निशाणी क्रमांक ३७** वर आहे. त्यानंतर पोलीसांना मी घटनास्थळ दाखवले व पोलीसांनी माझ्या समोर घटनास्थळ पंचनामा तयार केला. पोलीसांनी माझे बयान नोंदवले होते.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. आर. पी. कोडापे यांचे मार्फत सुरु -</u>**

३. तथाकथित घटनेच्यावेळी टिटवी येथे ग्रामपंचायत होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपीची पत्नी टिटवी ग्रामपंचायतची सदस्य होती. मला माहित नाही की त्यावेळी आरोपी हा शिवसेना पक्षाचा तालूका अध्यक्ष होता. मला माहित नाही की शिवसेना पक्षाची सत्ता टिटवी ग्रामपंचायत मध्ये होती. मला माहित नाही की आरोपीचे बांधकाम साहित्य विक्रीचा व्यवसाय होता. मला आठवत नाही की त्यावेळी टिटवीची लोकसंख्या किती होती व कोणता व्यक्ती काय काम करतो. मात्र लोकसंख्ये बाबतच्या नोंदी मी माइया डायरीमध्ये करुन ठेवल्या आहे. हे म्हणणे खरे आहे की मे २०१६ मध्ये वैयक्तिक लाभार्थ्यांच्या विहिरी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत टिटवी या गावासाठी मंजुर करण्यात आल्या होत्या. मला माहित नाही की टिटवीच्या सरपंच,

उपसरपंच व सदस्यांनी त्या विहिरींच्या बांधकामासाठी लागणारी रेती-गिटटी, मोठी दगडे पुरवण्याचे काम आरोपीला दिले होते.

४. मी टिटवी ग्रामपंचायतला सन २०१६ मध्ये रुजू झाली. मात्र मला रुजू होण्याची नेमकी तारीख आठवत नाही. मला माहित नाही की आरोपीने ग्राम पंचायत टिटवी ला मे, जुन २०१६ मध्ये विहिरींच्या बांधकामासाठी लागणारी रेती-गिटटी, मोठी दगडे पुरवली होती. हे म्हणणे खरे नाही की रेती-गिटटी व मोठी दगडे पुरवल्याबाबतचे देयक माझ्या कडे मंजुरीकरीता सादर करण्यात आले होते.

५. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सही शिवाय ग्रामपंचायतला पुरवण्यात आलेल्या साहित्याचे देयक मंजुर होत नाही. हे म्हणणे खरे नाही की त्या विहिरी माझ्या कार्यकाळात मंजुर झाल्या होत्या व बांधल्या सुध्दा होत्या. हे म्हणणे खरे आहे की विहिरीच्या मस्टरवर मी सही करण्याबाबत आरोपी माझ्या कडे येत होता. मी लाथार्थ्यांच्या घरी गेली असता मला आढळले की विहिरीचे काम झालेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला म्हटले की " जर मस्टरवर सह्या पाहिजे असल्यास, मला कामाच्या एकूण रक्कमेच्या दहा टक्के पैसे द्या''. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला दहा टक्के पैसे दिले नसल्यामुळे मी मस्टरवर सह्या केल्या नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की मी सरपंच व सदस्यांना कोणतीही माहिती न देता ग्राम पंचायतसाठी साहित्य खरेदी करत होते व त्यासाठी मी ग्रामपंचायतीच्या सभा घेत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/०६/२०१६ रोजी आरोपीच्या पत्नीने सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी मिळून गटविकास अधिका-यांकडे माझी तक्रार साहित्य खरेदीबाबत केली होती. मला माहित नाही की आरोपीच्या पत्नीने दिनांक ३०/०६/२०१६ रोजी पर्यावरण योजनेमध्ये पैश्याची अफरातफर मी केल्याबाबत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०५/०७/२०१६ रोजी ग्रामपंचायत

टिटवी अंतर्गत असणा-या शौचालयाच्या कारणामध्ये मी भ्रष्टाचार केल्याबाबत आरोपीने तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला जिवे मारण्याची धमकी दिली तसेच आरोपीला खोट्या गुन्हयामध्ये फसवण्याची सुध्दा धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०५/०७/२०१६ रोजी आरोपीने माझ्या विरोधात त्यामुळे कैफियत पोलीस स्टेशनला दिली होती व त्या कैफियतीवरुन पोलीसांनी माझयाविरोधात एन.सी.आर.नं.४९२/२०१६ कलम ५०६ अंतर्गत नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी आरोपीला म्हटले की *''तु माझ्या विरुध्द तक्रार का दिली व तक्रार दिल्यावर सुध्दा माझे काही बिघडत नाही, यापुढे मी तुमची कोणतीही शासकीय कामे होवू देणार नाही व तुमचे बिल कसे मंजुर होते ते मी पाहाते''.*

७. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या पत्नीने व आरोपीने माझ्या विरोधात दिलेल्या तक्रारीची चौकशी करण्याकरीता दिनांक ०७/०७/२०१६ रोजी गटविकास अधिकारी उच्च श्रेणी पंचायत समिती, घाटंजी यांनी श्री मस्के व श्री परांडे यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले होते.

८. हे म्हणणे खरे नाही की ग्रामपंचायतीमधून मिटींगसाठी बाहेर पडतांना मला संबंधीत रजिष्टरमध्ये त्याची नोंद घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की ग्रामपंचायतीमध्ये मी हजर असल्याबाबत मला ग्रामपंचायतीच्या हजेरीपटावर सही करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की तथाकथीत घटनेच्या दिवशी मी ग्रामपंचायतच्या शासकीय कामानिमित्य कर्तव्यावर हजर असल्याबाबत चे दस्तऐवज माझ्या कडे नाही. साक्षीदार स्वतः सांगते की त्याबाबतचा पुरावा पंचायत समितीला आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्राम पंचायतच्या शासकीय कामानिमित्य मी पंचायत समिती येथे तथाकथित घटनेच्या दिवशी गेल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही.

९. तथाकथित घटनेच्या दिवशी माझ्या कडे दुचाकी वाहन होते. पंचायत समिती घाटंजी पासून पोलीस स्टेशन घाटंजी येथे दुचाकीने जाण्याकरीता अंदाजे चार ते पाच मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की तथाकथित घटनेच्या दिवशी माझ्या कडे मोबाईल फोन होता व पंचायत समिती कार्यालयामध्ये सुध्दा फोन होता. हे म्हणणे खरे आहे की पंचायत समिती घाटंजी येथे कामानिमित्य लोक येत असतात व त्यामुळे पंचायत समितीच्या कार्यालयामध्ये गर्दी असते. पंचायत समितीच्या कार्यालयामध्ये सि.सि.टिव्ही कॅमेरे नव्हते.

**प्रश्न-** दिनांक १६/०७/२०१६ रोजी आरोपी व त्यांचे मित्र भोपीदास राठोड व सुरेंद्र गेडे हे पंचायत समिती कार्यालयामध्ये आले होते ?

**उत्तर-** त्यादिवशी आरोपी व त्याच्या सोबत इतर दोघे होते. मात्र त्या दोघांना मी ओळखत नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की दिनांक १६/०७/२०१६ रोजी संध्याकाळी अंदाजे ५.०० ते ५.३० च्या दरम्यान विस्तार अधिकारी घाटंजी यांनी आरोपींना पंचायत समिती कार्यालयामध्ये बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की विस्तार अधिका-यांना आरोपीने विचारले की ''नंदा कांगणे यांच्या विरोधात असलेल्या आरोपांची चौकशी केव्हा होणार आहे''. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी आरोपीने मला म्हटले की बिल मंजुर करा. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी मी आरोपीला म्हटले की ''साल्या मादरचोदा, भडविच्या, तुला मी अनेकदा सांगीतले की माझ्या पेमेंटचे पैसे अगोदर दे''. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी मी आरोपीला पायातील चप्पल काढून मारहाण केली व मी आरोपीच्या खिश्यातील दहा हजार रुपये हिसकावुन घेतले व आरोपीला मी जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की म्हणून या घटनेची तक्रार आरोपीने पोलीस स्टेशनला माझ्याविरुध्द त्याचदिवशी केली. हे म्हणणे खरे नाही की याची माहिती मला त्याचदिवशी मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की

मी पोलीस स्टेशनला जेव्हा गेली, तेव्हा आरोपी पोलीस स्टेशनमध्ये बसलेला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी पोलीसांना माझ्याविरोधात सांगत होता. हे म्हणणे खरे नाही की म्हणून आरोपीवर दबाव आणण्याकरीता मी आरोपीच्या विरोधात खोटी कैफियत दिली व मी आज खोटी साक्ष देत आहे.

११. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले होते की *"आरोपीने मला तेव्हा म्हटले की ''विहीरीच्या मस्टरवर* सह्या *करा''.* मात्र ही बाब माझ्या बयानात जशीच्या तशी का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले होते की *''विहिरीचे काम अस्तीत्वात नसल्यामुळे मी मस्टरवर* सह्या *करण्यास नकार दिला''*. मात्र ही बाब माझ्या बयानात का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की असे काही घडलेले नसल्यामुळे या बाबी माझ्या बयानात नाही. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले होते की *''आरोपीने* माझ्या *हातामध्ये असलेले रेकॉर्ड हिसकावून फेकून दिले''.* मात्र ही बाब माझ्या बयानात का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की असे काही घडलेले नसल्यामुळे या बाबी माझ्या बयानात नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक १६/०७/२०१६ रोजी सा.ना. क्रमांक ३६/२०१६ प्रमाणे आरोपीच्या रिपोर्टवरुन माझ्याविरुध्द पोलीस स्टेशन घाटंजी येथे नोंदविण्यात आला होता व त्यानूसार पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. हे मला माहित नाही की आरोपीने घाटंजी न्यायालयामध्ये प्रकरण क्रमांक ९८/२०१६ माझ्या विरुध्द दाखल केले होते व त्याची चौकशी सुध्दा पोलीसांनी माझ्याकडे केली होती. मी पोलीसांना सांगीतले होते की आरोपी माझ्याविरुध्द शुल्लक कारणावरुन तक्रारी करतात.

१२. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की "*आरोपीने मला तेव्हा म्हटले की ''विहीरीच्या मस्टरवर सह्या करा'', विहिरीचे काम अस्तीत्वात नसल्यामुळे,*

*मी मस्टरवर सह्या करण्यास नकार दिला, त्यामुळे आरोपीने मला जिवे मारण्याची धमकी दिली, तसेच आरोपीने माझ्या हातामध्ये असलेले रेकॉर्ड हिसकावून फेकून दिले व माझा हात आरोपीने ओढला, माझ्या बांगडया सुध्दा ओढल्या तसेच आरोपीने माझा पदर सुध्दा ओढला, आरोपीने मला शिवीगाळ केली की 'तु लई शाहाणी झालीस का तुला बघून घेतो, तु ये गावामध्ये', आरोपीने माझा हात ओढल्यामुळे माझ्या हाताला जखमा झाल्या, असे कृत्य करुन आरोपीने माझ्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला.*''. आरोपीच्या विरोधात पोलीसामध्ये कैफियत देण्यापूर्वी , मी वरिष्ठांची परवानगी घेतली नाही. साक्षीदार स्वतः सांगते की कैफियत देतेवेळी माझे वरिष्ठ माझ्यासोबतच होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीवर दबाव टाकण्याकरीता मी खोटी कैफियत दिली व आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपासणी काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक - २०/११/२०२५